# स्वातंत्र्यलढ्यातील शाहीर
# कवि गोविंद दरेकर
# लोकशाहीर आण्णाभाऊ साठे

आवृत्ती पहिली

संकलक
चंद्रकांत शहासने
(देशभक्तकोशकार)
मो.क्र. - ९८८१३७३५८५

कर्नाळा चारिटॅबल ट्रस्ट, पुणेच्या सौजन्याने

पुस्तकाचे नाव : स्वातंत्र्यलढ्यातील शाहीर कवि गोविंद दरेकर
लोकशाहीर आण्णाभाऊ साठे
संकलक : चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार) पुणे
मो.क्र. – ९८८१३ ७३५८५
प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे
११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,
चौथा मजला, पौड रोड, पुणे.
दुरध्वनी : ९८८१३७३५८५
हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.
प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती
मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७

कर्नाळा चारिटेबल ट्रस्टच्या राष्ट्रभक्ती प्रसार अभियानांतर्गत ही पुस्तिका बहुजन साहित्यधारा पुणे प्रकाशनाने प्रकाशित केली
मूल्य : रूपये ३०/–
संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे
मो. : ९३२२२६९७२१
श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली
९८५०५ ०९४१६

शालेय वितरणासाठी सवलतीने उपलब्ध.





### स्वातंत्र्य काव्य कुंज–कोकिल

# स्वातंत्र्यकवि गोविंद त्र्यंबक दरेकर



स्वराज्याच्या अमदानीत दरेकर घराणे शूर मराठा सरदारांत गणले जात होते. नगर जिल्ह्यातील कण्हेर पोखरी गावचे दरेकर कालांतराने राहुरी–बांबुरी येथे त्यांच्या मामाकडे कामाच्या शोधात आले. तेथून पुढे नासिक जवळील सातपूर येथे स्वातंत्र्यकविचे आजोबा नोकरीस आले. स्वातंत्र्यकवि गोविंद यांचा जन्म शके १७९५ श्रीमुखनाम संवत्सरे माघ वद्य अष्टमी सोमवार दि. ९/२/१८७४ पहाटे ३ वाजून ३ मिनिटांनी झाला. वडिलांचे नाव त्र्यंबक, आईचे नाव आनंदीबाई. त्या सुरगाणा संस्थानातील वडगावच्या जाधव घराण्यातील होत. आनंदीबाईच्या वडिलांचे नाव गंगारामजी जाधव तर आईचे नाव भीमाबाई असे होते.

कवी गोविंदाचा जन्म झाला त्यावेळेस श्री. त्र्यंबक दरेकर हे भद्रकाली मंदिरानजीक धोंडो महादेवाच्या हवेली समोरील बाळकृष्ण गायधनी यांचेकडे भाडोत्री रहात होते. नंतर ते विजयानंद नाट्यगृहाच्या मागे रहावयास गेले. कवी गोविंदाच्या बालपणी म्हणजे चौथ्या–पाचव्या वर्षीच त्यांचे पितृछत्र हरपले. आठव्या वर्षी ते शाळेत जाऊ लागले. याच सुमारास त्यांना भयंकर असे तापाचे दुखणे होऊन त्यातच त्यांना अपंगत्व आले. त्यामुळे ते शिक्षणात मागे पडले. तथापि ते जन्मजातच कवी होते. त्यामुळे आजुबाजूची मित्र मंडळी जमा होत असत व गोविंदाचे गाणे, लावण्या, तमाशा या विषयावर गप्पागोष्टी करणे चालूच असे. या काळात त्यांनी डफ, ढोलकी, तबला वाजविण्याची कला आत्मसात केली, त्यांनी लावण्या रचल्या, बाळा चितारी याने गोविंदास कातरकाम शिकविले. कवी गोविंद पतंग बनवून ते विकून, रॉकेलचे कंदील मिरवणूकीस भाड्याने देऊन पैसे कमवीत. त्यांना विडीचे जबरदस्त व्यसन लागले. वयाच्या सुमारे १८व्या वर्षी त्यांनी जवळील रहायची जागा सोडून नगरकरांच्या गल्लीत विश्वामित्रांचे घरी स्थलांतर

केले. अर्थात यामुळे गोविंदाच्या वागण्यात, बोलण्यात आचार-विचारात फरक जाणवू लागला. पूर्वीच्या नाच-गाणी लावण्यांचे ऐवजी नाटके पहाणे व पदे म्हणणे असा बदल झाला. चर्चेकरीता आता वैचारीक बैठकीची मंडळी त्याला मिळाली. यापूर्वी ओटीवर बसून गोविंदा आपल्या मित्रांत जसा म्होरक्या समजला जायचा तसाच आता नव्या वस्तीतही तो मित्रांमध्ये आपले म्होरकेपण सिद्ध करू शकला म्हणजेच चार चौघात चमकून दिसण्याचा त्यांचा स्थायीभावच होता. सन १८९८ मध्ये नाशिकात प्लेगची साथ आली व दरेकर कुटुंबीय मंगऱ्यास रहावयास गेले.. १८९९ साली पुनः ते नाशिकात आले. याच वेळेस शिक्षणाचे निमित्ताने भगूर येथून गणेश दामोदर व रा. विनायक दामोदर सावरकर हे याच नगरकरांच्या गल्लीतील वर्तकवाडयात रहावयास आले. नियती स्वातंत्र्याची बिजे नाशिकच्या प्रांगणात एकत्रित करीत होती.

सन १८९९ मध्ये नातू बंधूंची सुटका झाली. मात्र त्यांचे अभिनंदन सार्वजनिक व्यासपिठावर झाले नाही ही खंत तरुणांस लागून होती व अशाच तरुणांनी स्वतःचे व्यासपीठ तयार करण्याकामी मित्रमेळ्यात कवी गोविंद दरेकर यांनी प्रवेश केला. खऱ्या अर्थाने कवि गोविंद यांनी स्वदेशी विचार चालू करून स्वतःस राष्ट्रसेवेच्या धगधगत्या होमकुंडात झोकून दिले. रा. सावरकरादी मित्र-मंडळींत कवी गोविदांच्या प्रतिभेला पैलू पडले व स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या, मोरोपंताच्या तोडीचा कवी निर्माण झाला असे म्हटल्यास वावगे ठरू नये. मित्र-मेळ्याची बैठक दर शनिवारी किंवा रविवारी होत असे. मित्र मेळ्याचे मुख्य उद्दिष्ट असे होते कि मित्रमेळ्याचा प्रत्येक सभासद, चपलख, बहुशुत, व्यासंगी, ध्येयवादी, धार्मिक औद्योगिक सामाजिक क्षेत्रांचा अभ्यासू, तितकाच शारीरिक व शैक्षणिक दृष्ट्याही खंबीर असावा. मित्रमेळ्यातर्फे राष्ट्रवीर व धर्मवीरांचे उत्सव साजरे करून राष्ट्रभक्ति चेतविण्याचे उपक्रम राबविले जात असत. नाना फडणवीस, छत्रपती शिवाजी महाराज, श्री समर्थ रामदास, गणपती उत्सव तसेच अकबर जयंती सारखे उत्सव साजरे होत. संस्थेच्या या कार्यक्रमांचा पगडा कवी मनाच्या गोविंदावर पुरेपूर बसला व त्यातूनच राष्ट्रकवि जन्माला आला. मित्रमेळ्याचे सर्व सभासद राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा उद्देश मध्यवर्ती ठेवून त्या अनुषंगाने चळवळीमध्ये भाग घेण्यास समर्थ झालेले होते. चळवळीस पोषक अशी काव्यरचना कवी गोविंद व विनायक सावरकर हे करीत असत.

याच सुमारास पुण्यात 'सन्मित्र समाज मेळा' हा नाशिकच्या मित्र-मेळ्याचा





समविचारी संघ उदयास आला. सन्मित्रच्या गायन प्रसंगी पुण्यास हजारो लोकांची गर्दी जमत असे. दरेकरांनी केलेल्या पद्यरचना पुण्यातही प्रसिद्धीस पावल्या. १९०५ व १९०६ साली नाशिकच्या निवडक मंडळींनी पुण्यात व रायगड किल्ल्यांवर जाऊन राष्ट्रकाव्यांचे गायन केले. लोकमान्यांची प्रशंसा मिळविली, अशाप्रकारे मित्र- मेळ्याची लघु अभिनव मालेची ९ पद्य पुष्पे तयार झाली. यात पाच पुष्पे दरेकरांची होती.

## वंगभंग आणि अभिनव भारत

बंगालच्या फाळणीच्या जबरदस्तीने सारा हिंदुस्थान ढवळून निघाला होता. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्यया चतु:सूत्रीचा स्विकार केला होता. नोकरशाही 'बंगालची फाळणी हा वज्रलेप आहे' असे उन्मादाने सांगत होती. यावेळी **स्वदेशी केली तरी वंगभंग कायमच, बहिष्कार घातला तरी कायमच, राष्ट्रीय शिक्षणाकरीता विद्यालये काढली तरी वंगभंग कायमच. यावेळी तरुणांना अन्य मार्ग चोखाळणे आवश्यक वाटत होते. यातच दादाभाई नवरोजी यांनी कलकत्त्यास केलेल्या आपल्या उद्वेगाच्या भाषणात 'नोकरशाहीवर विश्वास ठेवून केलेल्या सर्व प्रयत्नांना अपयश आल्याचे मान्य केले व निराशेच्या गर्तेत गुंतून आता कदाचित आपणास वेड लागेल व आपण बंडास प्रवृत्त होऊ**' अशी तळमळ व्यक्त केली. या उद्वेगपूर्ण तळमळीच्या वक्तृत्वाने सहाजिकच तरुणमनांना राष्ट्रीय कार्याच्या वेडाने खरोखरच झपाटले, याचा परिणाम मित्र-मेळ्याच्या तरुणांवर झाला. यावेळी नासिक मित्रमेळा अभिनव भारत या सक्रिय संघटनेत रुपांतरीत झालेला होता. स्वराज्य म्हणजे निर्मळ स्वातंत्र्य व त्याकरीता सशस्त्र क्रांतीशिवाय अन्य उपाय नाही ही भावना तरुणांमध्ये रुजू लागली. पर्यायाने अभिनव भारताच्या कृतीचा संकल्प सर्वत्र पोचविण्याचे कार्य यावेळी कवी दरेकरांवर येऊन पडले. दरेकर स्वतः अपंग होते. त्यामुळे त्यांचा कायमचा मुक्काम नासिकलाच. स्वातंत्र्यवीर सावरकर लंडनमध्ये गेलेले होते. बाबाराव सावरकर बाहेरची कामे सांभाळीत. दरेकर २४ तास अभिनव भारताच्या कार्यास बैठक मारून तत्पर असत. कवी दरेकरांना अपंगत्वामुळे जरी स्थलांतर शक्य नव्हते तरी वैचारीक देवाण-घेवाण, सल्लामसलत, व्यूहरचना व त्यांची पद्यरचना ही सवाई होती. 'पंगु लंघयते गिरीम्' हे संस्कृत वचन त्यांनी सिद्ध केले होते. त्यांच्या मनाची, काव्यानी भरारी हिंदुस्थानच्या तरुणांच्या रोमारोमात राष्ट्रभक्तिचे रोमांच फुलविण्यास सक्षम ठरत होती. त्यावेळी अभिनव भारत संघटनेचे सर्व कृतीक्षेत्र

दरेकरांच्या भोवती केंद्रित झालेले होते.

स्वातंत्र्य चळवळीने जोर धरल्यानंतर उद्धवलेल्या अनेक प्रसंगात कवी दरेकर सर्वांना आधार देत होते. दातार बंधू, चंद्रात्रे, गोरे, केळकर, सावरकर बंधू यांसारखी कर्ती पुरुष मंडळी तुरुंगात गेलेली असताना त्यांच्या कुटुंबियांच्या निष्कांचन अवस्थेत, कौटुंबिक दुःखाच्या प्रसंगी सुविचाराने पाठबळ देण्याचे काम आबा दरेकर करीत असत. आर्थिक अडीअडचणी सर्व कसोट्या पणासलाऊन सोडवित असत. अनेकांना त्यांनी आत्महत्येपासून परावृत्त करून धीर दिला. आबा दरेकरांच्या माध्यमाने स्वातंत्र्यसंग्रामात पोळलेल्या कुटुंबियांची मुले-बाळे एकच कुटुंब म्हणून जगत असत. अशाप्रकारे आप्तजनांचे संसार त्यांनी कायम राखले.

सन १८९९ पासून सुरू झालेला मित्र-मेळा १९०६-१९०७ पर्यंत चांगलाच फोफावला होता. बाबाराम सावरकर हे मित्र-मेळ्याचे चिटणीस होते. नाशिक शहरांत मुष्टिफंड, राष्ट्रीय शाळा, स्वदेशीचा प्रचार याने जोर धरला होता. अभिनव भारताची लोकप्रियता नोकरशहांच्या नजरेत येऊ लागली. सन १९०७ मध्ये 'वंदे मातरम'चा खटला अभिनव भारतच्या श्री. बाबासाहेब खरे, रामभाऊ दातार, श्री. वर्तक यांच्यावर दाखल झाला. याचा त्रास दरेकरांनाही सोसावा लागला.

सन १९०८ मध्ये बंगालला बॉम्बस्फोट झाला. याचा परीणाम महाराष्ट्रावर व्हायचा तो झाला. टिळक व देशभक्त आण्णासाहेब परांजपे यांच्यावर खटले दाखल झाले. कवी दरेकरांच्या कविता अभिनव भारत संस्थेने छापल्या. या संस्थेने चिटणीस बाबाराव सावरकर हे होते. बाबारावांवर देशद्रोहाचे कलम १२१, १२१ अ लावण्यांत आले. आपल्या कवितांमुळे बाबारावांना जन्मठेप झाली. याची खंत दरेकरांना लागून राहिली व काही काळ त्यांनी काव्यलेखन बंद केले.

सन १९०९ च्या जॅक्सन वधाच्या खटल्याचे वेळी कवी दरेकर अत्यवस्थ होते. राज्यसत्तेच्या पोलिसांनी त्यांचेकडून माहिती काढण्याचा प्रयत्न केला. त्यांचे जिवाचे जिवलग पकडले गेले होते. पकडलेल्यांचे आप्तेष्ट शिव्या शाप देण्यातच धन्यता मानीत होते. काही काळ प्रकृती स्वास्थाकरीता गोविंद दरेकर (आबा) रामभाऊ दातारांकडे पुणे मुक्कामी गेले. सन १९१० मध्ये जॅक्सन वधाचा निकाल लागला होता. दरेकर पुनः नासिकात आले. उदासिनतेचे साम्राज्य सर्वत्रच पसरलेले. यावेळी शिक्षा झालेल्यांच्या





कुटुंबियांनी काही भलते सलते करू नये म्हणून त्यांना धीर देणे, धार्मिक ग्रंथ वाचून दाखविणे. रोजच्या गरजा भागविण्याची व्यवस्था करणे, पत्रव्यवहार करणे अशी हरतऱ्हेची कामे कवी गोविंदांच्या शिरावर येऊन पडलो. तो त्यांनी चोखपणे पार पाडली. अर्थात धार्मिक वाचनामुळे कवी मन अध्यात्माकडे झुकले.

सन १९१७ सालापर्यंत दरेकरांना असे स्तब्धतेचे जीवन जगावे लागले. सतराव्या प्रांतिक परीषदेने मात्र नासिकमधील वातावरण ढवळून काढले व दूरदूर विखुरलेले अनेक क्रांतिकारक पुनः कवी दरेकरांच्या घरी एक लागले. यामुळे दरेकरांना पुनः सचेतन अवस्था प्राप्त झाली व त्यांचा काव्य विलास सरस्वतीच्या चरणी पुनः रुजू झाला. १९२२ला श्री. गणेश दामोदर उर्फ बाबाराव सावरकर मुक्त झाले व १९२४ मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर तथा तात्या सावरकर जन्मठेपेतून मुक्त झाले. ही कवी गोविदांच्या आयुष्यातील सर्वात आनंददायी घटना, आबांनी (कवी गोविद) मुंबईस जाऊन बाबारावांची भेट घेतली तर तात्यांनी नाशकास येऊन आबांनी भेट घेतली.

आबांची तब्येतही दिवसेंदिवस खालावत चालली होती. वेदनांनी त्यांना जर्जर केले. दररोजची तगमग सहन होईनाशी झाली. उद्वेग व राष्ट्रीय स्थितीचा निजध्यास यामुळे ते बेचैन होत. आपला मृत्यु जवळ येत असल्याची जाणीव त्यांना झाली होती. आपल्या मातोश्रीची व्यवस्था त्यांनी लिहून ठेवली होती. त्यांनी स्वतःच्या जुन्या नव्या कवितांने मुद्रणासाठी एक मंडळ नेमले व कवितांपासून मिळणारे उत्पन्न सार्वजनिक संस्थांना द्यावे अशी योजना ठरविली.

राष्ट्रशाहीर गोविंद त्र्यंबक दरेकर उर्फ आबा यांनी लोकमान्य टिळकांना दैवत मानले होते. टिळकांच्या गुणगौरवपर अनेक रचना त्यांनी केल्या. गांधीजीच्या मार्गावर त्यांचा विश्वास नव्हता. त्यांच्या काव्यात गांधीजीवर त्यांनी एकही ओळ लिहीलेली नाही, ते चौकस बुद्धिचे व विचारांचे पक्के होते. आपल्या पंगुपणामुळे ते बऱ्याचदा उद्विग्न अवस्थेत जात. आपल्या मृत्युपूर्वी सुंदर मी होणार या अर्थाने काव्य त्यांनी लिहीले. दि. २८ फेब्रु. १९२६ रोजी फाल्गुन वद्य १ शके १८४७ रोजी रात्री २।। वाजता ते अनंतात विलीन झाले.

**संदर्भ: स्वातंत्र्यकवि गोविंद यांची कविता**

# स्वातंत्र्य काव्यकुंज–कोकिल यांची एक रचना

## ३७ अनभिषिक्त भूपति (१९०६) भूपाळी

**आर्यावर्ताचे अनिभिषिक्त भूपति लोकमान्य टिळक यांस नासिकचे विद्यार्थ्यांतर्फे कृतज्ञतापूर्वक मानपत्र**

अनंत तु प्रणिपात उदारा स्वजनमंगल करा । दयाळा ।।
स्वातंत्र्याच्या संता टिळका सुमनांजलि हा वरा ।।१।।

पश्चिमदिक्‌सिंधूनें गिळितां स्वसाम्राज्यदिनमणी दयाळा।
पारतंत्र्य–तमि राष्ट्र सांपडे स्वजनव्यसनकाननी ।।२।।

त्यास तारण्या कांही तारे देशभक्त चमकले। दयाळा।
विष्णु[१] मंगलाम परि ते झणि अस्तंगत जाहले।।३।।

मांगल्याचा मार्ग शोधितां तदा लोक श्रमले। दयाळा।
सर्वस्वातें तस्कर लुटता स्वातंत्र्या मुकले ।।४।।

अशांत राष्ट्रियगुणचंद्रिका प्रकाशीत निर्मला। दयाळा।
बुधेंद्र! भद्रा टिळका! चंद्रा! तुझा उदय जाहला ।।५।।

तुझा उदय जाहला कशाचा! भाग्योदय ठरला। दयाळा।
निजोन्नतीच्या–स्वातंत्र्याच्या मार्गी जन लागला ।।६।।

बोधामृत वर्षांतो निरंतर तुझा किरणकेसरी। दयाळा।
म्हणुनिच मृत–राष्ट्र सुराष्ट्रिय चैतन्यातें वरी ।।७।।



स्वातंत्र्यलढ्यातील शाहीर कवि गोविंद दरेकर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे

देशभक्तिचा सुंदर तरू तूं आर्यराष्ट्री लाविला। दयाळा।
श्रीनरहरिच्या कृपें धरित तो स्वातंत्र्याच्या फला।।८।।


राष्ट्र–जागृती संघ शक्तिस्तव गणाधीश प्रार्थिला। दयाळा।
स्वातंत्र्याचा देव शिवप्रभु महोत्सवें नटविला ।।९।।

स्वलोकमान्या तुझे वदान्या स्मरूं किति उपकार। दयाळा ।
देशमंगलासाठिं भोगिलें त्वां कारागार ।।१०।।

शुभदिन आम्ही कृतज्ञ व्हाया तुझ्या शीर्षभागिं ते। दयाळा।
प्रेमाश्रूची धारा धरितों 'अनभिषिक्त भूपते' ।।११।।

चाल – होवो जाग तविं जयजयकार। तसाच उत्सव प्रेमपुर:सर।
राष्ट्रविभूते! तुला दयाकर। करो चिरायु तो परमेश्वर।
तुझ्या प्रयत्नें तुझ्या देखतां वसुंधरा सुंदरा। दयाळा।
लेवो श्रीमत्स्वातंत्र्याचा भुवन–रुचिर बिजवरा ।।१२।।

**– कवि गोविंद**



# स्वातंत्र्यशाहीर आण्णा भाऊ साठे

दोन्ही हातांनी पट्टे चालवीत तोंडात ठेवलेले मणी ओठात धरलेल्या धाग्यात ओवून मण्यांची माळ लीलया तयार करण्याचे कसब आत्मसात केलेला हा योद्धा कालांतराने महाराष्ट्राचा शाहीर म्हणून प्रसिद्धीस पावला.

रानवारा पिऊन यथेच्छ भटकंती करणे, कुऱ्हाड चालविणे, गुरांच्या झोंब्या लावणे, सुरपारंब्या खेळणे, विटी चालविणे, पशुपक्षांशी मैत्री जोडणे या वेडाने तुकाराम पछाडला होता. रानातले त्याचे आवडीचे एक झाड होते. रानकापसे आणून ती झाडावर लटकवायची व त्यातील दाणे पक्षी खात असताना मजा बघायची. पक्षांचे आवाज काढायचे या छंदापायी तुकाराम रानात दिसताक्षणीच रानपाखरे त्याला साद घालीत. वाटेगावच्या परिसरातील यात्रा उत्सव यातून फेरफटका मारण्याचा छंदही त्यांस होता. बहिरी ससाणे गिधाडे यांना गोफणीने तीर कामठ्याने मारणे हे त्यांस फारच आवडे, नंतर त्यांना लोकगीते, पोवाडे, लावण्या गाण्याचा छंद लागला. यातूनच पुढे ते थोरामोठ्यांकडून शौर्याच्या कथा, शिकारीच्या गमती जमती, दंतकथा यांचा संग्रह करण्याकामी अनेकांशी दोस्ती जमवू लागले. यातच त्यांचा परिचय राष्ट्रीय चळवळीशी आला. क्रांतीवीर नाना पाटील, नागनाथ नायकवाडी, पांडू मास्तर, जी. डी. लाड, बर्डे गुरुजी यांसारख्या ध्येयवेड्या तरुणांशी त्यांचा संबंध आला,

रेठरे येथे तमाशाच्या फडाबरोबर तुकारामांची भ्रमंती चालू होती. अनपेक्षितपणे क्रांतीसिंह नाना पाटलांचे आगमन तमाशाच्या फडात झाले





व क्रांतीसिहाच्या थरारून सोडणाऱ्या मैदानी भाषणाचा परिणाम तुकारामाने स्वातंत्र्य लढ्यात उडी घेण्याइतपत झाला. याच काळात दुष्काळ पडला व तुकाराम  आपल्या आई ''वालुबाई''सह मुंबईत दाखल झाला मात्र नाना पाटलांच्या सानिध्याने 'फकिरांसारखे बंड करावे व गोरगरिबांना न्याय मिळवून द्यावा' याबाबतची स्वप्ने तुकाराम रंगवू लागला.

आण्णा भाऊ साठे म्हणजेच तुकाराम आपले वडील भाऊ साठे, आई वालुवाई, बहिण भागुबाई, जाई व भाऊ शंकर असे मुंबईच्या वाटेला लागले तेव्हा मजल-दरमजल करीत जे कल्याणला आले तेव्हाची एक अत्यंत हृदयद्रावक घटना आहे.

कल्याण रेल्वे स्टेशनच्या आवारात घुटमळत असलेल्या साठे कुटुंबियांना ख्रिश्चन मिशनऱ्यांनी गाठले व गोड बोलून आपल्या जाळ्यात ओढले व जवळच असलेल्या तारेच्या कुंपणामध्ये नेले. त्यावेळी उपेक्षित जाती जमातीच्या माणसांना काम देण्याच्या गोडस नावाखाली एकत्रित करत  असत. नजरकैदेत ठेवत असत व त्यांच्या स्वाभिमान, अस्मिता, संस्कृती, परंपरा यांना पद्धतशीर मूठमाती देऊन खिस्तीकरणाचे काम चाले. साठे कुटुंबिय जेव्हा तारेच्या कुंपणापाशी आले तेव्हा आतील दृश्य पाहूनच भाऊ साठे यांनी धोका ओळखला. गुन्हेगार जमातीचा कायदा व ह्यांची नजरकैद, कुंपणातील भयाण दृश्य असंख्य पिडित, रोगट माणसे आतमध्ये दिसत होती. मात्र आता येथून परत निघणे जवळ जवळ अशक्यच होते. परंतु याही परिस्थितीत काही दिवस त्यांना कंठावे लागले व तेथून पहाऱ्यावर असलेल्या लाला पठाण या रखवालदाराशी आण्णा (तुकाराम) ने संधान बांधले व एका सुदिनी रात्री बाराच्या सुमारास साठे कुटुंबियांनी या छळछावणीतून पोबारा केला. तेथून ते सरळ भायखळा येथे आले. येथे चांदबीबी चाळीत जिन्याखाली एका खोलीत भाऊ साठयांनी आपला स्वतंत्र संसार मांडला. या काळात अत्यंतिक परिश्रम करून साठे कुटुंबियांनी पडेल ते काम करून संसाराचा गाडा स्थिर केला, जुने कपडे विकण्याकामी फेरी वा धंदा करणाऱ्या एका मातंग व्यापाऱ्याच्या कपडयांचे बोजे डोक्यावर फिरवीत तुकारामाने सारी मुंबई पायी पालथी

घातली व अनुभवाचे डोंगर जमा केले. यावेळी मुंबईत चाललेल्या कामगार संघर्षाचा परिणाम त्यांच्या मनावर खोलवर झाला. मुंबईत जगण्यासाठी संघर्ष हे एक अलिखित सत्यच होय. तुकारामाच्या वाट्याला अनेक उद्योग आले, डोअर किपरची नोकरी, घरगड्याची नोकरी, सिनेमाची पोस्टर चिकटविणे, इलेक्ट्रीकच्या तारा ओढण्याची रोजंदारीचे कामे, पाईप टाकायची कामे, एक ना अनेक! पण तुकाराम व त्याचे कुटुंबिय यात स्थिर झाले होते.

अशातच स्वातंत्र्याची चळवळ चांगलीच जोर धरत होती व हिंदु-मुस्लिम दंगाही त्याच वेगाने चिघळत होता. भायखळ्याच्या जन जीवनात गरिबांना मुख्य त्रास या दंग्याचाच होता. हसिना नावाच्या एका तरुणीचा पाठलाग काही तरुण करीत होते. या मुस्लिम गुंडांनी तिला नागपूरहून मुंबईस विकण्याकरीता पळवून आणले होते. तिने भांबावलेल्या अवस्थेत भाऊ साठ्यांजवळ आश्रय घेतला तेव्हा तिला संरक्षण देत भाऊंनी तिला चांदबीबीच्या चाळीत आणले. चांदबीबीबाईला मुलबाळ नव्हते. तिने या तरुण हसिनाचा सांभाळ केला. परंतु हातची शिकार भाऊ साठयामुळे गेली याचा राग मुस्लिम गुंडांनी भाऊ साठ्यांवर काढला. भाऊंना भायखळा सोडून लपत लपत चेंबूर गाठावे लागले. तेथून फिरत फिरत ते माटुंगा लेबर कॅम्पात पोहोचले व तेथेच स्थायिक झाले. रोजंदारीची कामे बिनभरवशाची, थोडीशी स्थिरता नजरेत येताच गिरणीतून हकालपट्टी व्हायची. प्रकृतीही साथ देईनाशी झाली व अशाच निराशेत एके दिवशी भाऊ साठे यांनी मुला-बाळांसह मुंबईला रामराम ठोकला व सरळ वाटेगावची वाट धरली.

मुंबईच्या जीवनात काम करून दररोजच्या पोटापाण्याची भ्रांत नव्हती. मात्र गावात आल्यावर मर्यादीत कामधंदे, शिवाय गुन्हेगार जमातीचा शिक्का. त्यामुळे मर्यादा अधिकच. मुंबईच्या खुल्या मैदानात विचारांची भरारी घेणाऱ्या तुकारामाचे मन बंड करत उठे, परंतु इलाज तोकडा पडत होता. अशाच अंतर्मनाच्या आंदोलनाने तुकारामचे पाय तमाशाच्या फडाकडे वळले.

तमाशा फडात मातंग समाजाचे महत्त्वाचे योगदान होते. आण्णा (तुकाराम) भाऊ साठे यांच्या पदार्पणाची तमाशा सृष्टी जणू वाट पहात





होती. अत्यंत चपलखपणे पेटी, तबला, तरंग, बुलबुल, सारंगी, ढोलकी चालवित तितक्याच धीर गंभीर, किनऱ्या, भेदक आवाजात जेव्हा आण्णाभाऊ आपली रचना सादर करीत तेव्हा प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असे. तलवार बाजी, दांडपट्टा यासारख्या चपलख खेळामुळे आण्णा भाऊंवर साऱ्यांच्या नजरा खिळून असत. आण्णांनी तमाशा सृष्टीत स्वतःचे असे वेगळे अस्तित्व सिद्ध केले. शाहीराचा जन्म येथेच झाला. तमाशाला लोकनाट्याचे अलंकार याच शाहीराने दिले. तमाशात विररसाची उधळण करणारा हा पठ्ठा वारणेच्या खोऱ्यात गगनभेटी ठरला. स्वातंत्र्यलढा, संयुक्तमहाराष्ट्र लढा, गोवामुक्ती आंदोलन या वीराने आपल्या वाणीने चेतविले म्हटल्यास निश्चितच अतिशयोक्ती ठरणार नाही.

आण्णा भाऊंच्या ह्या जगावेगळ्या आक्रमक व भावनोत्कट कलागुणांची जपणूक करणारे कुटुंबिय आण्णाभाऊंना लाभले नाही. वडील वारले. थोड्याच दिवसांत पाटण तालुक्यातील काळगाव कोंडूबाई या मातंगाच्या मुलीशी आण्णांचे लग्न झाले. सुखासमाधानाचा लेकुरवाळा संसार असे तिचे भावविश्व होते. तर आण्णांना हिमशिखरांना गवसणी घालण्याकामी पोवाडा साद घालत होता. राष्ट्रीयत्वाच्या व स्वाभिमानाच्या या निधड्या छातीचा आण्णा आपले अलौकिक सरस्वतीचे वरदान कुटुंबियांना समजावू शकला नाही त्यामुळे घरची लक्ष्मी आण्णांवर सदैव नाराजच राहिली. १९४२ मध्ये आण्णांना पुत्ररत्न झाले.

शाहीरी फड आणि लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचे मनसुबे यांच्या घरापर्यंत पैसा आणण्याइतपत नव्हते. परिणामी आण्णा जेव्हा रिकाम्या हाताने घरी परतत तेव्हा त्यांचा पुरता कोंडमारा होई. आण्णांची राष्ट्रकार्याची तगमग समजून घेऊन त्यांना उभारी देण्याचे त्या अर्धांगिनीस जमले नाही. लूटमार हमाली, मजूरी करून भूक भागविणारा अन्नदाताच तिला हवा होता. मात्र अखंड स्वातंत्र्याचा उद्घोष करीत गुलामगिरीची मने उध्वस्त करून त्यात स्वातंत्र्याचे अंगार फुलवून रोम रोम रोमांचित करणारा हा कल्पतरू त्या अर्धांगिस उमगला नाही. समजला नाही! आण्णांच्या जीवाची तगमग होत

असे व त्या तगमगीतून डफावरच्या थापा वेग घेत असत व राष्ट्रीयत्वाचे अंगार फुलत. १९४२ चा लढा आझाद हिंद सेनेच्या धर्तीवर उभा राहिला होता व वाटेगावच्या बर्डे गुरुजींच्या नेतृत्वाखाली आण्णा लोकजागरण घालत होता. परिणाम व्हायचा तोच झाला. आण्णांवर वॉरंट निघाले व आण्णा भूमिगत होऊन मुंबईला पोहोचला.

**लाल बावटा पथक**

आण्णा लपत छपत डोंगरकुशीचा आधार घेत मुंबईच्या विस्तीर्ण जगतात पोहोचला. बहुजन समाजात जन्मलेला आण्णा टाकीचे घाव सोसून शोषितांच्या सुख-दुःखांचा चांगला जाणता झाला होता. अर्धांगीच्या असहकारामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन जवळजवळ नसल्यातच जमा होते. यावेळी समविचारी अशी अमर शेख, शाहीर गवाणकर मंडळी एकत्र जमली व राष्ट्रोद्वारक असे लाल बावटा पथक उभे राहिले. या शाहीर त्रिकुटाने महाराष्ट्राला जागविले. या काळात आण्णांनी वगनाट्याचे लेखनही केले. कम्युनिस्ट चळवळीचे ते प्रतिभावंत आधार बनले. १९४३-४४ च्या सुमारास आण्णांचा लोकजागरण दौरा पुण्यास होता. कम्युनिस्ट चळवळीच्या महिला संघाचे काम त्यावेळेस जयवंतीबाई या करीत असत. जयवंतीबाईचा दोन मुलींसह चाललेला सुरळीत संसार विस्कटलेला होता. जयवंतीबाईचे काका कम्युनिस्ट चळवळीची कामे करीत असत. आण्णा भाऊंच्या कार्याची तडफ व लोकजागृतीचे कसब पाहून सहाजिक जयवंतीबाईचा व आण्णांचा स्नेह वाढला. जयवंतीबाईच्या लहान मुली शांता व शकुंतला यांनाही स्नेह जडला व या सर्वांनी आणा भाऊंच्या एकाकी मनाला दिलासा देऊन जोपासले. दरम्यान जयवंतीबाईच्या वृद्ध चुलत्याचे निधन झाले. त्यांचा आधार तुटला. विचारांती आण्णा भाऊ व जयवंतीबाई यांनी १९४५ साली एकत्र राहून संसार करण्याचा निर्णय घेतला. व नोंदणी पद्धतीने विवाह केला.

शाहीर आण्णाभाऊंच्या अस्थिर जीवनाला यामुळे स्थैर्य लाभले. घाटकोपरच्या चिराग नगरातील पत्र्याच्याचाळीत शाहीरांनी संसार थाटला.





जयवंतीबाई व तिच्या दोन्ही मुलीनी या शाहीराची जीवापाड सेवा केली, कालांतराने शाहीर आण्णाभाऊंचा एकाकीपणाचा न्यूनगंड बाजूस सरला. शाहीरांचे काव्ये, वग यांचे लिखाण सुरु झाले. या काळात आण्णांनी ''लोक युद्ध'' साप्ताहिकात वार्ताहर म्हणूनही काम केले. त्यांनी स्वतःच्या राहत्या घरात छोटेसे ग्रंथालय उभे केले होते

आण्णाभाऊ साठे यांच्या लाल बावटा पथकावर स्वातंत्र्याच्या काळात बंदी घातली गेली. तमाशांवर बंदी आली तेव्हा आण्णांनी लोकनाट्य हे तमाशाचे दुसरे रूप सादर केले यामुळे शासनाची तोंडे बंद झाली.

आण्णाभाऊंनी स्वतःचे साहित्यविश्व निर्माण केले वाङ्मयीन मूल्ये जोपासना करणाऱ्या कादंबऱ्या -वारणेच्या खोऱ्यात चित्रा, फकिरा, मास्तर, वारणेचा वाघ, अग्निदिव्य, चंदन, चिखलातील कमळ, फुलपाखरू, टिळा लावीते मी रक्ताचा, आवडी/ वैजयंता, रत्ना, अलगुज, रानगंगा, संघर्ष, अहंकार, रूपा, आघात, गुलाम, मथुरा, मूर्ती, माकडीचा माळ, वैर, डोळे मोडीत राधा चाले, रानबोळा, कुरुप, पाझर, केवडयाचं कणीस, तारा अशा अनेक कांदबऱ्या, जवळ जवळ तीनशे कथा पैकी खुळवाडी, बरबाद्या कंजारी, कृष्णाकाठच्या कथा, आबी, भानामती, फरारी, लाडी, गजाआड, चिरागनगरची भूर्त, गुऱ्हाळ, जिवंत काडतूस, ठासलेल्या बंदूका, नवती, निखारा, भूताचा मळा, रानवेली, राम-रावण युद्ध, दवण्याची काडी, सातारी काडतूस, भोमक्या हे कथा संग्रह प्रसिद्ध झाले.

पोवाडे-नानकीन नगरापुढे, स्टालीन ग्राडचा पोवाडा, बर्लीनचा पोवाडा, बंगालची हाक, पंजाब दिल्लीचा दंगा, तेलंगणाचा रणसंग्राम, महाराष्ट्राची परंपरा, अमळनेरचे अमर हुतात्मे, मुंबईचा कामगार, काळ्या बाजारचा पोवाडा.

वगनाट्ये - पेंग्याचं लगीन, बिलंदर वडले, निवडणूकीत घोटाळे दुष्काळात तेरावा, अकलेची गोष्ट, खापुऱ्या चोर, देशभक्त घोटाळे, शेटजीचं इलेक्शन, बेकायदेशीर, माझी मुंबई, लोकमंत्र्यांचा दौरा, पुढारी मिळाला. याबरोबरच दोन अडीचशे गीते, कृषी गीते, गौळणी, द्वंद्वगीते, झगडा, लावणी

अशी रचना केली. सांगून गेले भीमराव, माझी मैना ही संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनावरील रचना अजरामर झाली आहे. अण्णा भाऊंच्या साहित्याचे हिंदी, बंगाली, मल्याळी, तामीळ, गुजराथी, उडीया तसेच रशियन, पोलीश, इंग्रजी, फ्रेंच अशा जगातील सत्तावीस भाषांमध्ये भाषांतर झाले आहे.

आण्णा भाऊ साठे यांचा काव्य व वाङ्मयाचा पसारा एवढा जबरदस्त होता की मराठी चित्रपटसृष्टीने त्यांना डोक्यावर नाचविले. आण्णाभाऊंच्या कथांवर बारा चित्रपटांची निर्मिती झाली. हिंदी, रशियन चित्रपट कलावंतही त्यांचे मित्र बनले. परंतु आपणांना यामुळे आर्थिक फायदा असा झाला नाही. व्यावहारीक दुनियेत आण्णांचे जीवन अपयशी ठरले. जवळचे मित्र दूर गेले. सरकारी मदतीचा ओघही त्यांना समाधान देऊ शकला नाही. मिळालेले सरकारी घरही जिवंतपणीच त्यांच्या आप्तांनी गहाणखत करुन फुंकून टाकले. १८ जुलै १९६९ रोजी आण्णाभाऊंचा भाषेवर प्रभुत्व गाजविणारा, शाहीरी काव्याचा स्रोत अनंतात विलीन झाला.

**संकलन : श्री. चंद्रकांत शहासने**